भाग 2: विम्याच्या कार्यपद्धती

प्रकरणातील घटक	पाठ्यक्रम शिकण्याची निष्पत्ती
छ) विमा पॉलिसी कशा खरेदी केल्या जातात आणि लिहील्या जातात	3.9, 3.11, 3.15
ज) महत्वाची कागदपत्रे	3.8, 3.12, 3.13, 3.14, 3.17
झ) विम्यातील महत्वाचे शब्द	3.8, 3.15, 3.16
ट) हप्ता भरणे आणि वैध संरक्षण यांची आवश्यकता	3.10

शिकण्याचे उद्देश

हे प्रकरण अभ्यासल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी करु शकाल:

- विमा कसा खरेदी केला जातो आणि लिहीला जातो याच्या मुख्य वैशिष्ट्यांचे वर्णन;
- विम्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या महत्वाच्या कागदपत्रांचे विश्लेषण आणि त्यांचे महत्व;
- विम्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या महत्वाच्या शब्दांची व्याख्या;
- वैध संरक्षणांसाठी हप्ता भरण्याच्या आवश्यकतेची चर्चा.

ओळख

या प्रकरणाच्या पहिल्या भागात आपण सर्व प्रकारच्या विम्याची मूलतत्वे पाहिली. दुसऱ्या भागात आपण त्यापुढे जाऊन विमा आणि विशेषतः जीवन विमा कसा खरेदी केला जातो हे पहाणार आहोत. आपण हे दोन प्रकारे करु.

आपण सुरुवातीला विम्याची महत्वाची कागदपत्रे पाहू, ज्यांची विमा घेणाऱ्यांना ओळख करुन दिली जाईल आणि त्यांच्या महत्वाविषयी चर्चा करु. विमा कंपनी आणि विमाधारकादरम्यान पॉलिसीच्या कालावधीदरम्यान या कागदपत्रांची देवाणघेवाण होईल. दुसरे म्हणजे, आपण जीवन विम्यामध्ये वापरले जाणारे काही महत्वाचे शब्द पाहू, जे तुम्हाला तुमच्या ग्राहकांना समजावून सांगावे लागतील.

हे सगळे विषय योग्यपणे व्यवस्थित समजावून घेण्यासाठी विमा कसा खरेदी केला जातो आणि लिहीला जातो याचा संक्षिप्त आढावा घेऊन आपण सुरुवात करु.

महत्वाचे शब्द			
या प्रकरणात खालील शब्द आणि संकल्पना समजावून सांगण्यात आल्या आहेत.			
बेचन पत्र	रद्द करणे	रद्द होणे	हप्त्याची पावती
बेचन देणारा	विचार करण्याचा कालावधी	नामनिर्देशन	पॉलिसी कागदपत्रे
मुखत्यार	अटींवर बेचन पत्र	सूचना	माहिती पुस्तिका
संपूर्ण बेचन पत्र देणे	अपवर्जन	पूर्ण पैसे भरलेले मूल्य	पुनरुज्जीवन
नियुक्त व्यक्ती	पृष्ठांकन	प्रस्ताव फॉर्म	समर्पण मूल्य

छ) विमा पॉलिसी कशा खरेदी केल्या जातात आणि लिहील्या जातात

याआधीच्या प्रकरणांमध्ये आपण पाहिले की व्यक्तींना विम्याची गरज का असते, विमा म्हणजे काय आणि त्यामागची मूलतत्वे काय आहेत. एखादी

व्यक्ती विमा पॉलिसी कशी खरेदी करते? त्यासाठी त्यांनी सर्वात आधी विमा उपलब्ध असल्याचे ऐकले असले पाहिजे.

छ)1 प्राथमिक माहितीचा स्त्रोत

प्रसार माध्यमातील जाहिरातींद्वारे विम्या कंपन्या त्यांच्या उत्पादानांविषयी माहिती देतात आणि कुतुहल निर्माण करतात. आपण पुढे पाहूच (विभाग ज 5 ग), आयआरडीएने विमा कंपन्यांची माहिती पुस्तिका आणि जाहिरातींमध्ये काय असावे यासाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्वे दिली आहेत.
व्यक्तिला या माहितीद्वारे हे समजू शकते की त्यांना विम्याची गरज आहे, आणि ती व्यक्ती कंपनी किंवा तिच्या एखाद्या एजंटशी संपर्क करु शकते. आपण ज) 5 (ग) या विभागात माहिती पुस्तिकेविषयी अधिक सविस्तर पाहू.

त्याशिवाय, एखादा जीवन विमा एजंट एखाद्या व्यक्तिशी संपर्क करु शकतो, आणि तो ज्या कंपनीचे प्रतिनिधित्व करतो त्या कंपनीच्या उत्पादनांची त्यांना ओळख करुन देऊ शकतो.

छ)2 विमा खरेदी करण्याचा हेतू

कुठल्याही व्यक्तीने तिच्या गरजेनुसार विमा खरेदी केला पाहिजे. बाजारामध्ये अनेक विमा उत्पादने उपलब्ध आहेत, त्यामुळे काळजीपूर्वक विचार करुन कुठले खरेदी करायचे हे ठरविले पाहिजे. आपल्या गरजांनुसार, एखादी व्यक्ती संपूर्ण जीवन विमा पॉलिसी, एंडोमेंट पॉलिसी, मनी बॅक पॉलिसी, मुलांसाठीची योजना किंवा निवृत्तीवेतन योजना इ. खरेदी करु शकते. आपण पुढील प्रकरणांमध्ये या उत्पादनांकडे सविस्तर पाहू.

छ)3 जीवन विमा कसा लिहीला जातो

बहुतेक विमा पॉलिसी **एकाच आयुष्याच्या** आधारे लिहील्या जातात, ज्यामध्ये केवळ एकाच आयुष्याला संरक्षण दिले जाते. सर्वसामान्यपणे पॉलिसी काढणारी व्यक्ती आणि ज्याच्या आयुष्याचा विमा काढण्यात आला आहे ती

एकच असतात, मात्र नेहमी असेच होईल असे नाही. याला **स्वतःची जीवन पॉलिसी** म्हणतात. दोन विमाधारक संयुक्तपणे एक पॉलिसी घेऊ शकतात- उदाहरणार्थ पती आणि पत्नी एक पॉलिसी घेऊ शकतात, ज्यामध्ये दोघेही विमाधारक असतात आणि त्यांच्या आयुष्याचा विमा काढण्यात आलेला असतो. याला **संयुक्त जीवन पॉलिसी** असे म्हणतात.

छ)4 प्रस्ताव फॉर्म

जाहिराती आणि माहिती पुस्तिकांद्वारे विमा कंपन्या प्रस्ताव फॉर्म मागवतात. ज्याला विमा काढायचा असतो त्याला **प्रस्तावकर्ता** असे म्हणतात- तो जीवन (किंवा कुठल्याही प्रकारच्या) विम्यासाठी स्वतःचा प्रस्ताव देतो. प्रस्तावकर्ता प्रस्ताव फॉर्म पूर्ण भरेल आणि तो विमा कंपनीत सादर करेल. विमा लेखक (अंडर रायटर) प्रस्ताव अर्जातल्या माहितीचे मूल्यांकन करेल आणि त्यानंतर प्रस्ताव स्वीकारायचा किंवा नाकारायचा याचा किंवा तो सुधारित अटींवर स्वीकारायचा का याचा निर्णय घेईल. ज)1 या विभागामध्ये आपण प्रस्ताव फॉर्म कसा असतो आणि त्याचे महत्व काय हे पाहू.

छ)5 प्रस्तावित दर

प्रस्तावित दर म्हणजे पॉलिसीचा किती खर्च येईल आणि तिच्या अटी कोणत्या. ते सांगितल्यानंतर प्रस्तावकर्त्याला पॉलिसी घ्यायची किंवा ती त्याच्यासाठी नाही हे ठरवण्यासाठी काही कालावधी दिला जाईल. जर प्रस्तावकर्त्याने प्रस्तावित दर/अटी स्वीकारल्या, तर विमा कंपनी, त्यांनी सांगितलेल्या अटी आणि दरांना बांधील आहे. मात्र प्रस्तावदराच्या कालावधीमध्ये प्रस्तावकाविषयीचे काही महत्वाचे तथ्य बदलले, तर विमा कंपनी त्याला बांधील नाही.

छ)6 विमा करार

विमा कंपनी ज्यादिवशी विम्याच्या हप्त्याची पहिली पावती देते त्यादिवसापासून विमा करार लागू होतो (विभाग ज3क पहा). पॉलिसीची कागदपत्रे नंतर पाठवली जाऊ शकतात (विभाग ज4) पहा. पॉलिसीची कागदपत्रे दिली जाण्याआधी, मात्र पहिल्या हप्त्याची पावती दिल्यानंतर, जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला, तर विमा कंपनी मृत्यूच्या दाव्याचे पैसे देण्यास बांधील आहे.

छ)7 नुतनीकरण

जीवन विमा पॉलिसी दीर्घ-कालीन पॉलिसी आहेत, त्या अनेक वर्षांच्या निश्चित कालावधीसाठी असतात. दुसरीकडे जीवनेतर विमा कंपन्या देत असलेल्या आरोग्य विमा पॉलिसी, अल्प-कालीन पॉलिसी असतात ज्या केवळ एक वर्षासाठी असतात. वर्षाच्या शेवटी, विमाधारकाला पॉलिसीचे नुतनीकरण करण्याचा सल्ला दिला जातो ज्यामुळे विम्याद्वारे मिळणारे संरक्षणाचे फायदे वाया जाणार नाहीत, आणि विमा कंपन्यांनाही त्यांचे ग्राहक सोडायचे नसतात. विमा कंपनी म्हणूनच विमा धारकाला पॉलिसीचे **नुतनीकरण** करण्यासाठी आमंत्रित करेल. आपण हे नुतनीकरण पुढील प्रकरणांमध्ये अधिक सविस्तर पाहू.

छ)8 सारांश

विमा कसा खरेदी केला जातो याचा एक आढावा घेतल्यानंतर, विम्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक असतात आणि त्यातील काही तांत्रिक शब्द पाहून आपण या माहितीत आणखी भर घालू. हे सर्व व्यावहारिक संदर्भात पाहण्यासाठी आपण नितीश शर्मा आणि त्याचे जीवन विमा एजंट श्री कुमार यांचे प्रकरण अभ्यासू.

घटनेचा अभ्यास

नितीश शर्मा याची पदवी कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे. तो 28 वर्षांचा आहे आणि त्याची पत्नी सुमेधा गृहिणी आहे. एकदा त्याला श्री कुमार या विमा एजंटने संपर्क केला. त्यांच्या संभाषणादरम्यान, श्री कुमार यांनी नितीशला जीवन विम्याची गरज असल्याचे दाखवून दिले. नितीश म्हणाला तो आधीपासून याचा विचार करत होता, कारण नुकतीच त्याने एका विमा कंपनीची माहिती पुस्तिका पाहिली होती त्यामुळे त्याने विमा योजना खरेदी करण्याचे मान्य केले.

ज) महत्वाची कागदपत्रे

विम्याशी संबंधित अनेक महत्वाची कागदपत्रे असतात- त्यापैकी काही आपण आधीच्या विभागात पाहिली आहेत. ही कागदपत्रे विमाधारक आणि विम्याबद्दलची माहिती देतात आणि काही नुकसान झाल्यास दावा करण्याच्या वेळी ती विम्याच्या अस्तित्वाचा पुरावा देतात. ही कागदपत्रे कुठली आहेत हे आपण या विभागात पाहणार आहोत.

ज)1 प्रस्ताव फॉर्म

नितीशला जीवन विमा घेण्यामध्ये फायदा वाटतो आहे आणि त्याची पॉलिसी विकत घेण्याची इच्छा आहे हे ऐकल्यानंतर श्री कुमार पहिली गोष्ट करतील ती म्हणजे नितीशला भरण्यासाठी **प्रस्ताव फॉर्म** देणे.

घटनेचा अभ्यास

नितीशने प्रस्ताव फॉर्म पाहिल्यावर त्यामध्ये विचारण्यात आलेल्या माहितीमुळे तो गोंधळून जातो. त्याला प्रश्न पडतो की त्याला प्रस्ताव फॉर्म भरायची काय गरज आहे, कारण तो विमा योजना खरेदी करण्यासाठी किंमत मोजायला तयार आहे. तो असेही विधान करतो की तो सुशिक्षित असल्यामुळे ठीक आहे, तो जर अशिक्षित असता – तर त्याने विमा योजना खरेदी केली असती का?

आता श्री कुमार नितीशच्या प्रश्नांना कशी उत्तरे देतील हे पाहू.

प्रस्ताव फॉर्म किंवा विनंती फॉर्म हे प्रस्तावकर्त्याने भरुन विमा कंपनीला देणे आवश्यक असलेले पहिले कागदपत्र आहे. आपल्या प्रकरणामध्ये नितीश प्रस्तावकर्ता आहे. प्रस्तावकर्त्याने प्रस्ताव फॉर्म स्वतः स्वतःच्या हस्ताक्षरात भरला पाहिजे. मात्र त्याला काही अपवाद असू शकतात, उदाहरणार्थ प्रस्तावकर्ता अशिक्षित असेल किंवा अर्जात वापरलेली भाषा समजू शकत नसेल. त्यामुळेच प्रस्तावकर्त्याला विमा योजनेची पूर्ण कल्पना आहे आणि विमा खरेदी करण्याशी तो सहमत आहे याची काळजी घेणे आवश्यक आहे.

एखादी व्यक्ती त्या गटासाठी किती जोखीम आहे याचे मूल्यांकन करण्यासाठी प्रस्ताव फॉर्म हा विमा स्वीकारणाऱ्याला माहिती पुरवणारा मुख्य स्त्रोत आहे. त्यामुळेच तुम्ही पाहू शकता की प्रस्तावकर्त्याने दिलेली माहिती अचूक असणे महत्वाचे आहे. आपण 3 ऱ्या प्रकरणात परम सद्भावाचे महत्व आणि महत्वाची तथ्ये यांची आवश्यकता यांचा विचार केला.

विमा कंपनी प्रस्ताव फॉर्मद्वारे खालील माहिती गोळा करते:

- ज्याच्या आयुष्याचा विमा काढण्यात आला आहे त्याची माहिती: नावाचा तपशील, वय, पत्ता, वैवाहिक दर्जा, उंची, वैद्यकीय इतिहास इ.;
- प्रस्तावकर्त्याची माहिती: जर प्रस्तावकर्ता आणि ज्याच्या आयुष्याचा विमा काढण्यात आला आहे या दोन वेगळ्या व्यक्ती असतील तर प्रस्तावकाविषयीची माहिती जसे नाव, वय, व्यवसाय आणि ज्याच्या आयुष्याचा विमा काढण्यात आला आहे त्याच्याशी नाते (म्हणजे ज्याचा जीवन विमा उतरवण्याची गरज आहे ते कारण) इ. देखील फॉर्ममध्ये देण्यात आलेले असतात;

- ज्या प्रकारच्या विमा योजनेची विनंती करण्यात आली आहे त्याचा तपशील;
- नामनिर्देशनाचे तपशील (विभाग झ)4(क) पहा) ;
- विनंती करण्यात आलेल्या पुरवणी कलमांचे (असतील तर) तपशील (आपण बाजारात उपलब्ध वैयक्तिक उत्पादने पाहू तेव्हा पुरवणी कलम म्हणजे काय हे पाहू); आणि
- प्रस्तावकर्त्याने याआधी घेतलेल्या इतर विमा योजनांचे तपशील.

ज)1(क) प्रस्ताव फॉर्ममधील घोषणा

प्रस्ताव फॉर्मच्या शेवटी प्रस्तावकर्त्याने स्वाक्षरी करायची एक घोषणा असते. या घोषणेवर सही करुन प्रस्तावकर्ता नमूद करतो की त्यांनी अर्जात दिलेली सर्व माहिती खरी आहे आणि त्यांना उत्तर देण्यापूर्वी प्रश्न पूर्णपणे समजले आहेत.

या अर्जावर स्वाक्षरी करणे महत्वाचे असते. ही घोषणा मान्य करुन प्रस्तावकर्त्याला याची जाणीव असते की:

- देण्यात आलेली कुठलीही माहिती खोटी असल्याचे आढळले तर विमा कंपनी करार रद्द करु शकते आणि सर्व हप्ते ठेवून घेऊ शकते; आणि
- त्यांना सर्व प्रश्न समजल्याचे नमूद करुन, भविष्यात कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण झाला तर, त्यांना चुकीची माहिती देण्यात आली होती किंवा कुठल्याही प्रकारे दिशाभूल करण्यात आली होती असा दावा ते करु शकत नाहीत.

नितीशने उपस्थित केलेल्या अशिक्षित प्रस्तावकर्त्यांच्या प्रश्नाचे काय- ते प्रस्ताव फॉर्म कसा पूर्ण करु शकतात आणि घोषणेवर सही कशी करतील? जर प्रस्तावकर्ता अशिक्षित असेल, तर त्यांच्या डाव्या

अंगठ्याचा ठसा घेतला जाईल आणि तिसऱ्या पक्षाला त्यांच्या अंगठ्याचा ठसा प्रमाणित करावा लागेल. अंगठ्याचा ठसा प्रमाणित करणाऱ्या व्यक्तीस (तृतीय पक्ष), त्याने प्रस्तावकर्त्याला त्याच्या भाषेमध्ये प्रश्न पूर्णपणे समजावून सांगितल्याचे आणि प्रस्तावकर्त्याशी चर्चा करून अचूक उत्तरे भरल्याचे घोषित करावे लागेल. या प्रकरणी घोषित करणाऱ्या व्यक्तीचा पत्ताही घेतला जाऊ शकतो.

काही वेळेला प्रस्तावकर्त्याची भाषा प्रस्ताव फॉर्मातील भाषेपेक्षा वेगळी असू शकते. अशा प्रकरणी, प्रस्तावकर्ता जिथे प्रस्ताव फॉर्म पूर्ण करतो आणि त्यांच्या भाषेमध्ये घोषणेवर स्वाक्षरी करतो, तिथे प्रस्तावकर्त्याला स्वतःच्या हस्ताक्षरात त्याच्या स्वाक्षरीवर हे देखील जाहीर करावे लागते की, त्यांना सर्व प्रश्न समजावून सांगण्यात आले होते आणि पूर्णपणे समजून घेतल्यानंतरच त्यांनी प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.
हा प्रस्ताव फॉर्म आणि प्रस्तावकर्त्याची घोषणेची स्वाक्षरी या विमा कराराचा आधार ठरतात आणि कायद्याच्या दृष्टीने ती अतिशय महत्वाची कागदपत्रे आहेत. म्हणूनच प्रस्तावकर्त्याने प्रश्न समजून घेणे आणि त्यांची खरी उत्तरे देणे महत्वाचे आहे.

उदाहरण

राकेश चावला हे अशिक्षित व्यक्ती आहेत. त्यांचे वय 48 वर्षे आहे आणि त्यांना केवळ हिंदी भाषा बोलता येते आणि समजते. त्यांनी एक जीवन विमा पॉलिसी खरेदी करण्याचे ठरविले आहे, त्यासाठी ते जीवन विमा एजंटशी संपर्क करतात. एजंट राकेश चावलांना एक फॉर्म देतो, जो त्यांनी भरायचा आहे. फॉर्म इंग्रजीमध्ये आहे आणि राकेश यांना ती भाषा फारशी येत नाही. त्यामुळेच विमा एजंट त्यांना त्यांचे

शाळा शिक्षक मित्र निलेश टंडन यांची फॉर्म भरण्यात मदत घेण्याचा सल्ला देतो, ज्यांचे हिंदी आणि इंग्रजी दोन्हीचे ज्ञान चांगले आहे. निलेश टंडन राकेश यांच्या वतीने फॉर्म भरण्याचे मान्य करतात. ते राकेश यांना प्रत्येक प्रश्न क्रमाने हिंदीमध्ये समजावून सांगतात आणि राकेशने दिलेली उत्तरे फॉर्मवर नोंदवतात.
फॉर्म पूर्ण झाल्यानंतर, राकेश चावला यांनी फॉर्मवर त्यांच्या अंगठ्याचा ठसा उमटवणे आवश्यक आहे, ज्याद्वारे त्यांना सगळे प्रश्न समजल्याचे आणि त्यानुसार उत्तरे दिल्याचे घोषित केले जाईल.

निलेश टंडनही फॉर्ममध्ये देण्यात आलेल्या घोषणेवर सही करतात की प्रस्ताव अर्जातील प्रश्न प्रस्तावकर्त्याला त्याला पूर्णपणे समजेल अशा भाषेत समजावून सांगण्यात आले आहेत आणि त्यानुसारच उत्तरे नोंदवण्यात आलेली आहेत.

ज)2 वयाचा दाखला

घटनेचा अभ्यास

नितीश शर्माने प्रस्ताव फॉर्म पूर्ण भरुन श्री कुमार यांना दिला ज्यांनी नितीशला वयाच्या दाखल्यासाठी त्याचे उच्च माध्यमिक गुणपत्रक मागितले. नितीश म्हणाला त्याला ते शोधावे लागेल- वयाच्या दाखल्यासाठी तो इतर काही कागदपत्रे सादर करु शकेल काय?- आणि त्याला त्याचे वय सिद्ध करण्याची काय गरज आहे?
प्रस्तावकर्त्याच्या जोखीमेचे स्वरुप निश्चित करण्यासाठी विमा कंपनी जे घटक वापरते त्यापैकी वय हा एक घटक आहे आणि त्यानुसार हप्ता आकारला जातो. त्यामुळेच विमा कंपन्यांनी प्रस्तावकर्त्याचे योग्य वय पडताळून पाहणे आवश्यक आहे.

जी कागदपत्रे वयाचा वैध दाखला म्हणून स्वीकारली जाऊ शकतात त्यांचे दोन वर्गांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते **वयाच्या दाखल्याची प्रमाणभूत कागदपत्रे** आणि **वयाच्या दाखल्याची अप्रमाणभूत कागदपत्रे.** जी कागदपत्रे वयाचा प्रमाणभूत पुरावा म्हणून स्वीकारली जाऊ शकतात ती आहेत:

- शाळा किंवा कॉलेजच्या नोंदींमधले प्रमाणपत्र;
- जन्म-मृत्यू नोंदणी अधिकाऱ्याकडून प्रमाणित प्रमाणपत्र किंवा जन्माच्या वेळी नगरपालिकेमध्ये केलेल्या नोंदीवरुन बनवण्यात आलेले प्रमाणपत्र;
- पारपत्र;
- परमनंट अकाउंट नंबर (पॅन) कार्ड;
- मालकाचे सेवा नोंदणीपुस्तक;
- बाप्तिस्म्याचे प्रमाणपत्र;
- कुटुंबाच्या बायबलच्या प्रतिवर जन्मतारीख असेल तर तिचा प्रमाणित भाग;
- सैन्यदलातील कर्मचाऱ्यांचे संरक्षण विभागाने दिलेले ओळखपत्र;
- रोमन कॅथलिक चर्चचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

वयाच्या दाखल्याची काही अप्रमाणभूत कागदपत्रे जी वयाचा वैध दाखला म्हणून स्वीकारली जाऊ शकतात ती आहेत:

- जन्माच्या वेळी बनविण्यात आलेली जन्मपत्रिका;
- शिधावाटप पत्रिका;
- स्वयंघोषणेच्या पद्धतीने प्रतिज्ञापत्र, वयाने मोठ्या व्यक्तीने घोषित करणे आणि
- गावाच्या पंचायतीचे प्रमाणपत्र

जन्मतारखेच्या दाखल्याशिवाय व्यक्तीला त्याच्या पत्त्याचा दाखला, एक छायाचित्र आणि हप्ता भरणे आवश्यक आहे. विमा कंपनी व्यक्तीला बँकेची सहा महिने ते एक वर्षापर्यंतची स्टेटमेंट सादर करायला सांगू शकते. हप्ता रोख किंवा धनादेशाव्यतिरिक्त, क्रेडिट कार्डद्वारे, प्रस्तावकर्त्याच्या बँक खात्यातून थेट जमा किंवा ऑनलाईन पेमेंट गेटवेज, इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टीम (ईसीएस) इ. द्वारे भरता येतो.

विम्यामध्ये काळा पैसा गुंतवला जाऊ नये यासाठी आयआरडीएने, गेल्या काही वर्षात, काळ्या पैशाविरोधी (एएमएल)/ दहशतवादाला वित्तपुरवठ्याविरोधी लढाईची (सीएफटी) मार्गदर्शक तत्वे विमा कंपन्यांसाठी अधिक कडक केली आहेत त्यामुळे "तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या" (केवायसी) प्रक्रियेमध्ये अतिशय काळजी घेतली जाते. केवायसी प्रक्रियेनुसार ओळख सिद्ध करण्यासाठी, ग्राहकाला खालील गोष्टी सादर कराव्या लागतात:

- वयाचा दाखला;
- ओळखीचा दाखला;
- पत्त्याचा दाखला; आणि
- उत्पन्नाच्या दाखल्याची कागदपत्रे (ज्या रकमेचा विमा मागितला आहे त्यानुसार विमा कंपनीने मागितल्यास).

ग्राहकाची ओळख आणि हप्ता भरण्यासाठी त्यांच्या उत्पन्नाचा स्त्रोत स्पष्टपणे सिद्ध करण्यासाठी वरील कागदपत्रे घेतली जातात. काळ्या पैशाविरोधाची चर्चा प्रकरण 12 मध्ये अधिक तपशीलाने केली जाईल.

ज)3 हप्त्याची पावती

प्रकरणाचा अभ्यास

नितीश शर्माने वयाचा आणि पत्त्याचा वैध दाखला व छायाचित्र श्री कुमार यांना सादर केले. त्याने त्यांना हप्त्यासाठी विमा कंपनीच्या नावे धनादेशही दिला. त्याने श्री कुमार यांना विचारले की त्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे किंवा नाही हे त्याला कसे आणि केव्हा समजेल.
श्री कुमार यांनी त्याला सांगितले की आयआरडीएच्या नियमांनुसार विमा कंपनीला 15 दिवसांच्या आत त्याला निर्णय कळवावा लागेल. त्यांनी नितीशला हे ही सांगितले की विमा कंपनी पहिल्या हप्त्याची पावती देऊन आणि त्याचवेळी किंवा नंतर पॉलिसीचे कागदपत्र देऊन विमा कंपनी प्रस्ताव स्वीकारल्याचे कळवेल.

या विभागामध्ये आपण हप्त्याच्या दोन प्रकारच्या पावत्यांची चर्चा करु- पहिल्या हप्त्याची पावती आणि हप्त्याच्या नुतनीकरणाची पावती. आपण पुढील ज)4 या विभागात पॉलिसीचे कागदपत्र पाहू.

ज)3(क) पहिल्या हप्त्याची पावती (एफपीआर)
जसे आपण श्री कुमार यांनी नितीशला दिलेल्या उत्तरात पाहिले, त्याप्रमाणे विमा कंपनी प्रस्तावकर्त्याला त्याचा प्रस्ताव स्वीकारल्याचे आणि **पहिल्या हप्त्याची पावती (एफपीआर)** देऊन हप्ता मिळाल्याचे कळवेल. एफपीआर महत्वाची असते कारण विमा करार सुरु झाल्याचा तो पुरावा आहे. कराराचा पुरावा असलेले, पॉलिसीचे कागदपत्र कदाचित काही दिवसांनी दिले जाईल.

पहिल्या हप्त्याच्या पावतीमध्ये खालील माहिती असते:

- विमाधारकाचे नाव आणि पत्ता;

- पॉलिसी क्रमांक;
- भरलेल्या हप्त्याची रक्कम;
- हप्ता भरण्याची पद्धत आणि कालावधी;
- हप्ता भरण्याची पुढची तारीख;
- जोखीम लागू झाल्याची तारीख (जेव्हापासून संरक्षण लागू होते);
- पॉलिसी परिपक्व होण्याची तारीख;
- शेवटचा हप्ता भरण्याची तारीख; आणि
- विमा रक्कम.

ज)3(ख) हप्त्याच्या नुतनीकरणाची पावती (आरपीआर)

एफपीआर देण्यात आल्यानंतर, विमा कंपनी प्रस्तावकर्त्याकडून पुढील हप्ते मिळाल्यानंतर पुढच्या पावत्या देईल. या पावत्या **हप्त्याच्या नुतनीकरणाच्या पावत्या (आरपीआर)** म्हणून ओळखल्या जातात. हप्ता भरण्यासंदर्भात काही वाद निर्माण झाल्यास आरपीआर पैसे भरल्याचा पुरावा असतो, म्हणूनच तो महत्वाचा असतो. आरपीआर आणि एफपीआर, पॉलिसीच्या कागदपत्रांसह सुरक्षित ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरुन गरज पडल्यास ती सहजपणे सादर केली जाऊ शकतात.

जाणून घ्या

विमा लेखक प्रस्ताव स्वीकारायचा किंवा नाकारायचा याचा निर्णय घेतात. जर विमा लेखकाने प्रस्ताव सुधारित अटी आणि नियमांनुसार स्वीकारला तर, प्रस्तावकर्त्याने सुधारित अटी आणि नियम स्वीकारल्यानंतर आणि अतिरिक्त हप्ता

भरल्यानंतरच (जर असल्यास) एफपीआर दिला जाईल. आयआरडीएच्या नियमांनुसार प्रस्तावासंदर्भातील निर्णय प्रस्तावकर्त्याला 15 दिवसांच्या आत कळवणे आवश्यक आहे. पुढील प्रकरणामध्ये आपण विमा स्वीकारणाऱ्याची भूमिका अधिक तपशीलाने पाहू.

प्रश्न 3.3

वयाचा वैध दाखला म्हणून कुठली कागदपत्रे स्वीकारली जाऊ शकतात?

ज)3(ग) विचार करण्याचा कालावधी किंवा 'फ्री लुक-इन पिरीएड' अथवा 'कुलींग-ऑफ पिरीएड' म्हणजे काय?

प्रकरणाचा अभ्यास

श्री कुमार नितीश शर्माचा प्रस्ताव, हप्ता आणि दाखले विमा कंपनीला पाठवण्यापूर्वी, नितीशचा एक शेवटचा प्रश्न आहे: 'विमा पॉलिसी घेतल्यानंतर मी माझा विचार बदलला तर काय होईल?'

एफपीआर देण्यात आल्यानंतर करार झाल्याचे स्पष्ट होते आणि तो दोन्ही पक्षांसाठी बांधील आहे. तरीही, आयआरडीए नियमांनुसार पॉलिसीची कागदपत्रे मिळाल्यानंतर, प्रस्तावकर्ता पॉलिसीच्या काही अटी आणि नियमांशी असहमत असल्यास 15 दिवसांच्या आत करारातून माघार घेण्याचा पर्याय त्याला देण्यात आला आहे. या कालावधीलाच विचार करण्यासाठीचा कालावधी किंवा 'फ्री लुक-इन पिरीएड' अथवा 'कुलींग-ऑफ पिरीएड' म्हणतात. जर प्रस्तावकर्त्याने करारातून माघार

घेतली तर, विमा कंपनीला हप्ता परत करावा लागेल, त्यातून काही रक्कम वजा केली जाईल, जसे जितक्या कालावधीसाठी जोखीमेस संरक्षण पुरवण्यात आले होते त्याचा खर्च, वैद्यकीय तपासणीचा खर्च आणि मुद्रांक शुल्क.

या प्रकरणाच्या ट विभागात आपण हप्ता भरणे आणि वैध संरक्षण यांचे महत्व याविषयी पाहू.

प्रश्न 3.4

हप्त्याच्या पहिल्या पावतीमध्ये (एफपीआर) कोणती माहिती दिलेली असते?

ज)4 पॉलिसीचे कागदपत्र

नितीश शर्माला हप्त्याची पहिली पावती मिळाल्यानंतर काही दिवसातच पॉलिसीची कागदपत्रे मिळाली. नितीश या कागदपत्राकडून काय अपेक्षा करु शकतो? ते कसे असेल? पॉलिसीचे कागदपत्र हे विम्याशी संबंधित सर्वात महत्वाचे कागदपत्र असते. विमाधारक आणि विमा कंपनी यांच्यातील कराराचा तो **पुरावा** आहे. मात्र ते कागदपत्र म्हणजे करार नाही: विमाधारकाकडून पॉलिसीचे कागदपत्र गहाळ झाले, तर त्याचा विमा करारावर काहीही परिणाम होणार नाही. विमा कंपनी करारामध्ये कुठलाही बदल न करता केवळ पॉलिसीची दुसरी प्रत देईल. पॉलिसीच्या कागदपत्रावर योग्य अधिकाऱ्याची स्वाक्षरी हवी आणि **भारतीय मुद्रांक कायद्यानुसार** त्यांचे मुद्रांकन करणे आवश्यक आहे.

एका प्रमाणभूत पॉलिसीमध्ये खालील विभाग असतात:

मथळा	प्रस्तावना
सक्रिय कलम	अटी
परिशिष्ट	साक्षीची सही
नियम आणि अटी/ विशेष हक्क आणि अटी	पृष्ठांकन

पॉलिसी कागदपत्राच्या **मथळ्यामध्ये** कंपनीचे नाव आणि पत्ता आणि त्यांचे प्रतिक चिन्ह यांचा समावेश असतो.

पॉलिसीची **प्रस्तावना** नमूद करते की प्रस्ताव आणि प्रस्तावकर्त्याची स्वाक्षरी असलेले घोषणापत्र हा कराराचा आधार असतो.

सक्रिय कलम दोन्ही पक्षांची खालील बाबींसंदर्भातील पारस्परिक बांधिलकी स्पष्ट करते:

- विमाधारकाने हप्ते भरणे; आणि
- विमा काढण्यात आलेली घटना घडल्यास विमा कंपनीने विमा रक्कम देणे, अर्थात त्यासाठी दावा करणाऱ्याला वयाचा आणि हक्काचा दाखला सादर करावा लागेल.

पॉलिसीच्या **अटींमध्ये** खात्रीशीर समर्पण मूल्य, नामनिर्देशन, पॉलिसीच्या संरक्षणावर बेचन पत्र आणि कर्ज इ. संदर्भातील तरतुदी नमूद केलेल्या असतात.

परिशिष्टामध्ये पॉलिसीचा महत्वाचा तपशील दिलेला असतो, जसे

- पॉलिसी सुरु होण्याची तारीख;
- पॉलिसी परिपक्व होण्याची तारीख;
- विमाकृत रक्कम (पॉलिसी केव्हा आणि किती रक्कम देईल);
- द्यायचे हप्ते आणि त्यांची तारीख;
- नामनिर्देशित व्यक्ती (प्रस्ताव फॉर्ममध्ये नमूद केले असल्यास);
- काही विशेष कलमें;
- पुरवणी कलमासंदर्भातील तपशील;
- अपवर्जन; आणि
- अधिकार

विमाकर्ता पॉलिसी धारकाने भरलेल्या प्रस्ताव अर्जाची एक छापील प्रतही पॉलिसीच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट करतो, ज्यामुळे कुठलीही संदिग्धता राहात नाही.

साक्ष्यांकन ह्या गोष्टीची पुष्टी करते की विमाकर्त्याने सही करुन पॉलिसीचे कागदपत्र अधिकृत केले आहे. हे साक्ष्यांकन विमा कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्यांकडून दिले जाऊ शकते.

नियम आणि अटी निम्नसंदर्भात असतील:

- हप्ता भरण्यासाठी देण्यात आलेले वाढीव दिवस;
- हप्ता न भरण्याचे परिणाम; आणि
- कर्जाची उपलब्धता.

या विभागामध्ये पॉलिसी कशी कायदेशीर वारसाला नेमायची, पॉलिसी कशी समर्पित करायची किंवा तिला पूर्ण पैसे भरलेली किंवा पेड अप पॉलिसी (झ) विभागात याचा अर्थ काय हे आपण पाहू) कशी बनवायची आणि दावा कसा करायचा हे पाहू. या

विभागामध्ये पॉलिसीमध्ये काही अपवर्जन असल्यास त्याचे तपशीलही दिले जातील.

अपवर्जन म्हणजे पॉलिसीमध्ये ज्या जोखीमांना संरक्षण देण्यात आलेले नाही त्याचे निवेदन. संरक्षणातून वगळण्यात आलेल्या जोखीमांमुळे काही नुकसान झाले, तर विमा कंपनी विमा रक्कम देणार नाही. अपवर्जन हे सर्व जीवन पॉलिसींसाठी समान असू शकते (दुसऱ्या विमा कंपन्यांनी दिलेल्या पॉलिसीही ते अपवर्जन लागू करु शकतात). याचे एक उदाहरण म्हणजे जर विमा धारकाने विमा पॉलिसी खरेदी केल्यानंतर वर्षभरात आत्महत्या केली तर पॉलिसी नुकसान भरपाई देणार नाही. विमा लेखक पॉलिसीमध्ये विशिष्ट व्यक्तीमुळे निर्माण होणाऱ्या जोखीमेचा अपवर्जन म्हणून समावेश करु शकतो. उदाहरणार्थ विमा लेखक गिर्यारोहण, नौकावहन किंवा इतर जलक्रीडा प्रकार अशा साहसी क्रीडाप्रकारांमुळे झालेला मृत्यू वगळण्याचा निर्णय घेऊ शकतो, ज्यांना विमाकर्त्याने जोखीमपूर्ण किंवा धोकादायक मानले आहे. विमा लेखक असे का करेल हे आपण प्रकरण 4 मध्ये पाहू, जेव्हा आपण विमा लेखक काही वेळेस खराब जोखीम देखील सुधारित अटींवर कशी स्वीकारतो हे पाहू.

मूळ जीवन विमा पॉलिसीच्या अटी आणि नियमांमध्ये बदल करण्यासाठी, एका कोऱ्या कागदावर पृष्ठांकन देऊन ते पॉलिसीच्या मूळ कागदपत्राला जोडले जाऊ शकते. पृष्ठांकनाचा वापर करुन जीवन विमा पॉलिसीमध्ये सहजपणे बदल करता येऊ शकतात. पृष्ठांकन हा पॉलिसीचाच एक भाग आहे.

पॉलिसीच्या माहितीविषयी निवेदन

आयआरडीएने प्रत्येक पॉलिसीसोबत पॉलिसीच्या माहितीविषयी निवेदन देणे बंधनकारक केले आहे. पॉलिसीच्या माहितीविषयी निवेदनामध्ये खालील बाबींचा समावेश आवश्यक आहे:

- हप्ता भरण्यासाठी उपलब्ध सुविधा आणि किती कालावधीने हप्ता भरायचा आहे याची माहिती;
- पॉलिसी संदर्भात किंवा तिच्या सेवेसंदर्भात कुठलीही चौकशी करायची असल्यास संपर्क करण्याची व्यक्ती आणि कार्यालय;
- पॉलिसीधारकाच्या आणि नामनिर्देशित व्यक्तीच्या पत्त्यात काही बदल झाल्यास विमा कंपनीला तो कळवण्याचे महत्व;
- काही अडचणी किंवा तक्रारी असल्यास काय करायचे; आणि
- विमा लोकपालाच्या ठिकाणाविषयी माहिती.

विमा कंपनीने प्रस्ताव एकदा स्वीकारला आणि पहिल्या हप्त्याची पावती आणि पॉलिसी प्रस्तावकर्त्याला दिली की प्रस्तावकर्त्याला विम्याचे संरक्षण मिळते. त्या क्षणापासून आपण त्यांना प्रस्तावकर्ता असे म्हणत नाही- ते आता **पॉलिसी धारक** आहेत- ज्यांच्याकडे विमा पॉलिसी असते.

ज)5 पृष्ठांकन, सूचना आणि माहितीपुस्तिका

घटनेचा अभ्यास

नितीश शर्माने श्री कुमार यांच्याशी चर्चा करतांना विचारले की हप्ता भरण्याच्या पद्धतीमध्ये आणि कालावधी इ. मध्ये काही बदल करण्याची त्याला करारामध्ये परवानगी आहे का आणि असल्यास कशी.

श्री कुमार नितीशला पृष्ठांकनाविषयी समजावून सांगतात. ते त्याला सूचना तसेच माहितीपुस्तिका अशा इतर कागदपत्रांविषयीही

समजावून सांगतात ज्यामुळे नितीश यांनी जीवन विम्याविषयी विचार करायला सुरुवात केली होती.

ज) 5 (क): पृष्ठांकन

पॉलिसीच्या कालावधीत विमा कंपनी पृष्ठांकन जोडून, मूळ पॉलिसीमध्ये बदल करायला परवानगी देते. पृष्ठांकन वापरुन विमा रक्कम, पॉलिसीचा कालावधी, हप्ता भरण्याची पद्धत आणि कालावधी, नामनिर्देशन आणि बेचन पत्र इ. मध्ये बदल केला जाऊ शकतो.

पृष्ठांकन हे एका कोऱ्या कागदावरही देऊन पॉलिसीला जोडले जाऊ शकते ज्याद्वारे पॉलिसीमधील सुधारणा दर्शवल्या जातात. पॉलिसीधारकाला नामनिर्देशन बदलायचे असेल, तर पॉलिसीच्या मागच्या बाजूला पृष्ठांकन केले जाऊ शकते. त्याचप्रमाणे पॉलिसीच्या मागच्या बाजूला बेचन पत्रही तयार केले जाऊ शकते. (नामनिर्देशन आणि बेचन पत्र याबाबत प्रकरणात पुढे झ)4(क) आणि झ)4(ख) यामध्ये चर्चा करण्यात आली आहे.)

ज)5 (ख) सूचना

पॉलिसीच्या कालावधीत विमा कंपनी पॉलिसीधारकाला सूचना देते. त्या आहेत:

- पॉलिसीधारकाला हप्त्याची रक्कम भरण्याच्या तारखेची आठवण करण्याच्या सूचना;
- बोनसच्या सूचना;
- हप्ता थकल्याच्या आणि पॉलिसी रद्द होण्याच्या सूचना;
- पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याच्या सूचना;

- फायदे कधी दिले जातील याच्या सूचना- जीवित असण्याचे फायदे/ परिपक्वतेचे फायदे इ.; आणि
- युनिटशी निगडित पॉलिसीसंदर्भात वार्षिक निवेदन

याची नोंद घेणे महत्वाचे आहे की या सूचना केवळ माहिती देण्यासाठी आणि पॉलिसी धारकाला हप्त्याची तारीख, फायदे आणि पॉलिसीची स्थिती इ. माहिती देण्यासाठी वापरल्या जातात.

ज)5(ग): माहितीपुस्तिका

विमा कंपन्या त्यांच्या उत्पादनांची माहिती देण्यासाठी आणि लोकांमध्ये त्यांच्या उप्तादनांविषयी उत्सुकता निर्माण करण्यासाठी माहितीपुस्तिका वापरतात हे आपण छ)1 या विभागात पाहिले. आयआरडीएच्या ऑक्टोबर 2002 सालच्या सुधारित (पॉलिसीधारकांच्या हक्कांचे संरक्षण) नियमानुसार, विमा कंपनीने दिलेल्या माहिती पुस्तिकेत प्रत्येक विमा योजनेखाली खालील गोष्टी स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक आहे:

- कसे फायदे देण्यात आले आहेत;
- अटी;
- कुठलेही आश्वासन;
- नियम आणि अटी;
- पात्रता;
- अपवाद; आणि
- बोनसमध्ये सहभागी होण्याचा किंवा बोनस मिळण्याचा कुठलाही अधिकार.

बोनसमध्ये सहभागी होण्याचा किंवा बोनस मिळण्याचा अधिकार पॉलिसी घेतल्यानंतर काही काळापर्यंत लांबवण्यात आल्यास, तसे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. खात्रीशीर फायदे कुठले आहेत आणि कुठल्या फायद्यांची खात्री नाही याचे स्पष्ट निवेदन हवे. माहितीपुस्तिकेमध्ये याचाही उल्लेख हवा की खात्री नसलेले फायदे भविष्यात तसेच असतीलच असे नाही आणि त्यात बदलही होऊ शकतो.

ज)6 दाव्याच्यावेळी आवश्यक कागदपत्रे

विमा काढण्यात आलेले नुकसान झाल्यास, दावा करण्यासाठी दावा करणाऱ्याने विमा कंपनीला काही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जीवन विम्यासाठी विमा कंपनीला मृत्यू खरोखरच झाला आहे याचा पुरावा म्हणून मृत्यूचा दाखला लागेल. आपण प्रकरण 11 मध्ये जेव्हा दावे हा विषय पाहू तेव्हा, दाव्याच्या वेळी आवश्यक असलेल्या कागदपत्रांविषयी पाहू.

सुचवण्यात आलेला उपक्रम

कुठल्याही विमा कंपनीचा प्रस्ताव फॉर्म घ्या. अर्जाचे विश्लेषण करा आणि त्यामध्ये कोणती माहिती मागण्यात आली आहे याची यादी तयार करा.

विम्याशी संबंधित महत्वाच्या कागदपत्रांमध्ये बरेच असे शब्द असतील ज्याला विम्यामध्ये विशिष्ट अर्थ आहे. विमा पॉलिसी कसे काम करते हे पाहण्यासाठी या

शब्दांचा अर्थ काय हे जाणून घेणे आवश्यक आहे आणि म्हणून आपण पुढच्या विभागात काही महत्वाचे शब्द पाहणार आहोत.

झ) विम्यातील महत्वाचे शब्द

विम्यातील काही विशिष्ट शब्द आपण याआधीच्या विभागात वापरले आहेत आणि या विभागामध्ये आपण ते आणि इतर शब्द समजावून घेऊ. हे महत्वाचे शब्द तुम्हाला समजायला मदत व्हावी यासाठी आपण त्यांचे वर्गीकरण करु:

- पॉलिसीचे अस्तित्व कायम राहण्याशी संबंधित शब्द: जसे **रद्द होणे**, **प्रदत्त मूल्य** आणि **समर्पण मूल्य**. यासंदर्भात आपण **पुनरुज्जीवन** आणि **नुतनीकरणही** पाहणार आहोत.
- पॉलिसीची रक्कम कुणाला मिळणार आहे याच्याशी संबधित शब्द: **नामनिर्देशन** आणि **बेचन पत्र** आणि
- पॉलिसीवर कर्ज घेण्याशी संबंधित शब्द: **कर्ज** आणि **परिसमापन**

झ)1 रद्द होणे, प्रदत्त मूल्य आणि समर्पित मूल्य

विम्याचे हप्ते भरणे शक्य नाही असे विमाधारकाला वाटले तर काय होईल याचे वर्णन हे तीन शब्द करतात. प्रत्येक पॉलिसीमध्ये ते कसे कार्य करतील याचे त्या पॉलिसीच्या नियम आणि अटींमध्ये वर्णन केलेले असेल.

घटनेचा अभ्यास

नितीश शर्माला पहिल्या हप्त्याची पावती मिळाल्यानंतर त्याला खात्री पटली की त्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे. त्यानंतर तो आपल्या

गुंतवणुकीविषयी आपल्या पत्नीला सांगतो. सुमेधाला नितीशच्या निर्णयाविषयी शंका वाटते आणि त्याला विचारते की भविष्यात तो हप्ते भरु शकला नाही तर काय होईल. त्याला गुंतवलेले पैसे परत मिळतील का?

तिला कसे उत्तर द्यायचे याची नितीशला कल्पना नाही. तो त्याचे एजंट श्री कुमार यांच्याकडे पुन्हा एकदा जातो आणि हा प्रश्न त्यांना विचारतो. श्री कुमार त्याला समजावून सांगतात की नितीशने हप्ता भरला नाही तर त्याची पॉलिसी **रद्द होईल.** असे झाल्यास नितीश विमाकर्त्याला पॉलिसी **पेड अप** म्हणजे **पूर्ण पैसे भरलेली** करु शकतो. ते नितीशला याचीही माहिती देतात की तो पॉलिसी समर्पित करुन स्वेच्छेने पॉलिसी रद्द करु शकतो. या प्रकरणी विमा कंपनी काही अटी आणि नियमांनुसार **समर्पण मूल्य** त्याला देईल. नितीश शर्मा श्री कुमार यांनी वापरलेल्या शब्दांमुळे गोंधळून गेला आहे (रद्द होणे, प्रदत्त, समर्पण मूल्य) आणि श्री कुमार यांना ते अधिक तपशीलाने समजावण्याची विनंती करतो. म्हणून श्री कुमार नितीशला पॉलिसीशी संबंधित शब्द समजावण्यास सुरुवात करतात.

पॉलिसीधारकाकडे तो हप्ते भरु शकत नसेल तर तीन पर्याय आहेत. ते आहेत:



झ)1(क) रद्द होणे

पॉलिसी धारकाने विमा कंपनीशी सहमत झाल्याप्रमाणे **नियोजित तारखांना** नियमितपणे हप्ता भरणे आवश्यक आहे. विमा कंपनी नियोजित तारखेशिवाय काही दिवस वाढवून देऊ शकते ज्यामध्ये पॉलिसीधारक हप्ता भरु शकतो आणि तो वेळेतच मानला जाईल. मात्र, या वाढीव कालावधीमध्येही त्यांनी हप्ते भरले नाहीत तर ती थकबाकी मानली जाईल.

हप्त्यांची थकबाकी राहिल्यास विमा कंपनीला करार रद्द करण्याचा अधिकार आहे. यालाच **'रद्द होणे'** असे म्हणतात. पॉलिसी रद्द झाल्यानंतर कुठलाही दावा केला जाऊ शकत नाही आणि सर्व हप्ते जप्त होतात.

जाणून घ्या

वाढीव कालावधी हा साधारणपणे एक महिन्याचा असेल, पण वार्षिक, सहामाही किंवा तिमाही हप्त्यांसाठी 30 दिवसांपेक्षा कमी नसेल, आणि मासिक हप्त्यांसाठी 15 दिवसांचा असेल. काही विमाकर्ते मासिक हप्ता भरण्यासाठीही 30 दिवसांचा वाढीव कालावधी देतात.

मात्र प्रत्यक्षात, विमा कायदा विमा कंपनीला पॉलिसी रद्द झाल्यास भरलेले सर्व हप्ते ठेवण्याची परवानगी देत नाही. याचे कारण म्हणजे प्रत्येक पॉलिसी खालील दोन कारणांसाठी राखीव निधी ठेवते:

- पॉलिसीच्या सुरुवातीच्या कालावधीतील हप्ते हे एकसमान हप्त्यांपेक्षा अधिक असतात (लेवल प्रिमियम); आणि
- हप्त्यामधील बचतीचा भाग.

हा राखीव निधी जप्त करण्यात आला तर पॉलिसीधारकाच्या दृष्टीने ते योग्य होणार नाही. जेव्हा हप्ते थकतात तेव्हा पॉलिसीच्या अटींमध्ये पॉलिसीधारकाचे संरक्षण करण्यासाठी काही तरतुदी असतात. त्यांना जप्ती-विरोधी तरतुदी म्हणतात. पुरेसे हप्ते भरले असतील तर पॉलिसी प्रदत्त पॉलिसी केली जाऊ शकते आणि पॉलिसीमध्ये बचतीचा घटकही असतो. बहुतेकवेळा पॉलिसीधारक अशीच विनंती करतात की कराराच्या स्वरुपानुसार, आधी भरलेल्या एकूण हप्तांच्या आधारे तो आपोआप पेड अप अथवा प्रदत्त बनविला जावा.

झ)1(ख) प्रदत्त मूल्य (पेड अप व्हॅल्यू)

ज्या पॉलिसीचे काही मूल्य असण्याची क्षमता असते उदा. एडोंमेंट योजना किंवा बचत योजना आणि पॉलिसीधारक हप्ता भरु शकला नाही म्हणून ती रद्द झाल्यास, विमा कंपनी पूर्ण विमा रक्कम देण्यास बांधील नाही. अशी रद्द झालेली पॉलिसी ही पेड अप पॉलिसी किंवा प्रदत्त पॉलिसी बनवली जाऊ शकते. पेड अप पॉलिसीमध्ये विमा रक्कम कमी करुन ती आत्तापर्यंत भरलेल्या हप्त्यांच्या आधारे ठरवली जाते.

प्रदत्त मूल्य काढण्याचे समीकरण आहे:

[{भरलेल्या हप्त्यांची संख्या ÷ एकूण देय हप्त्यांची संख्या} × विमा रक्कम] + काही बोनस असल्यास = प्रदत्त मूल्य

प्रदत्त मूल्यासाठी काही किमान रक्कम घेण्यावर विमा कंपन्या जोर देतात. जर प्रदत्त मूल्य या किमान रकमेपेक्षा कमी असेल तर, जप्ती विरोधी फायदा लागू होणार नाही आणि पॉलिसी रद्द होईल. पॉलिसीधारक कदाचित समर्पण मूल्य घेऊ शकेल (ज्याबाबत आपण विभाग झ)1(ग) मध्ये चर्चा करु).

सर्वसामान्यपणे विमा कंपन्या पॉलिसीधारकाला जर त्याने किमान तीन वर्ष हप्ते भरले असतील तर सामान्य पॉलिसी प्रदत्त किंवा पेड अप बनवण्याचा अधिकार देते. या कालावधीनंतर जर पॉलिसीधारक उरलेले हप्ते भरु शकला नाही तर पेड अप पर्यायानुसार पॉलिसी रद्द केली जाणार नाही. त्याऐवजी, विमा रक्कम भरलेल्या एकूण हप्त्यांच्या पटीत कमी केली जाईल. विमा रकमेचे इतर फायदे देय असतील तर ते कमी झालेल्या विमा रकमेशी संबंधित असतील, जे पेड अप मूल्य किंवा प्रदत्त मूल्य असेल.

फायद्या-सहित पॉलिसी पेड अप किंवा प्रदत्त बनवली जाते तेव्हा बोनसचे काय होते?

फायद्या-सहित पॉलिसीचे प्रदत्त मूल्य काढतांना, आधी मंजूर झालेल्या किंवा दिलेल्या बोनसमध्ये काही बदल होणार नाही. केवळ विमा रक्कम भरलेल्या हप्त्यांच्या पटीत कमी केली जाते. प्रदत्त मूल्य काढण्यासाठी जमा बोनस कमी करण्यात आलेल्या विमा रकमेमध्ये मिळवला जातो. मात्र, प्रदत्त पॉलिसीला पुढे कुठलेही बोनस मिळत नाहीत.

उदाहरण

राकेश सिंह यांची बचत पॉलिसी आहे. त्यांच्या पॉलिसीचे तपशील खालील प्रमाणे आहेत:

पॉलिसीचा कालावधी	20 वर्षे
पॉलिसी सुरु होण्याची तारीख	4 जून 2001
विमा रक्कम	5,00,000 रुपये
हप्ता भरण्याची पद्धत	वार्षिक
शेवटचा भरलेला हप्ता	4 जून 2008
भरलेल्या हप्त्यांची संख्या	8
एकूण देय हप्त्यांची संख्या	20
देण्यात आलेला बोनस	50,000 रुपये

वरील माहितीवरुन आपल्याला कळते की राकेश सिंह यांनी आठव्या वर्षात हप्ता भरणे बंद केले. त्यांची पॉलिसी पूर्णपणे रद्द होणार नाही. त्याऐवजी विमा रक्कम आत्तापर्यंत भरलेल्या हप्त्यांच्या पटीत कमी केली जाईल.

प्रदत्त मूल्य = [(भरलेल्या हप्त्यांची संख्या /एकूण देय हप्त्यांची संख्या) × विमा रक्कम] + बोनस

= [(8/20) x रु. 5,00,000] + रु. 50,000

= रु. 2,00,000 + रु. 50,000

= रु. 2,50,000

त्यामुळे पॉलिसीचे प्रदत्त मूल्य हे रु. 2,50,000 एवढे असेल.

झ)1(ग) समर्पण मूल्य

आधी नमूद केल्याप्रमाणे पॉलिसीधारकाला असे वाटले की तो यापुढे हप्ते भरु शकत नाही तर पॉलिसीचा काही दावा येण्यापूर्वी किंवा ती परिपक्व होण्यापूर्वी, तो पॉलिसी समर्पित करुन रद्द करु शकतो आणि समर्पित मूल्य त्याला लगेच मिळू शकते.

मात्र पॉलिसीमध्ये काही मूल्य असण्याची क्षमता असली पाहिजे, उदा. एंडोमेंट किंवा बचत योजना. पॉलिसी समर्पित करणे म्हणजे स्वेच्छेने करार रद्द करणे आहे. विमा कंपन्या पॉलिसी समर्पित करण्यासाठी तीन किंवा सात वर्षांचा कालावधी बंधनकारक करतात. 'समर्पण मूल्य' किंवा 'रोख मूल्य' म्हणजे पॉलिसी समर्पित केल्यानंतर विमा कंपनीद्वारे देय असलेली रक्कम. समर्पण मूल्य हे सामान्यपणे भरलेल्या हप्त्यांची टक्केवारी असते किंवा प्रदत्त मूल्याची टक्केवारी असते.

समर्पण मूल्य भरलेल्या हप्त्यांच्या आधारे काढले जाते. म्हणून:

पॉलिसीचा कालावधी कमी असेल तर समर्पण मूल्यही कमी असेल
25 वर्षांची पॉलिसी जर पाच वर्षांनंतर समर्पित करण्यात आली, तर भरलेल्या हप्त्यांची रक्कम, नंतर म्हणजे समजा दहा वर्षांनंतर समर्पित

केलेल्या पॉलिसीपेक्षा कमी असेल. समर्पण मूल्य आधी भरलेल्या हप्त्यांवर आधारित असल्यामुळे दहा वर्षांनंतर समर्पित केलेल्या पॉलिसीचे समर्पण मूल्य, पाच वर्षांनंतर समर्पित केलेल्या पॉलिसीच्या तुलनेत जास्त असेल.
दीर्घ-मुदतीची पॉलिसी आणि कमी- मुदतीची पॉलिसी दोन्ही सारख्या वर्षांनी समर्पित करण्यात आल्या तर दीर्घ-मुदतीच्या पॉलिसीसाठीचे समर्पण मूल्य कमी- मुदतीच्या पॉलिसीच्या समर्पण मूल्यापेक्षा कमी असेल.
अ आणि ब अशा दोन पॉलिसींचा विचार करु. अ पॉलिसीचा कालावधी 15 वर्षांचा आहे आणि ब पॉलिसीचा कालावधी 20 वर्षांचा आहे. दोन्ही पॉलिसी दहा वर्षांनंतर समर्पित करण्यात आल्या आणि त्यांचे दरवर्षी भरले जाणारे हप्ते समान आहेत. अ पॉलिसीचे समर्पण मूल्य ब पॉलिसीपेक्षा अधिक असेल कारण अ पॉलिसीमध्ये दोन-तृतीयांश हप्ते आधीच भरण्यात आले आहेत, मात्र ब पॉलिसीमध्ये केवळ अर्धे हप्तेच भरण्यात आले आहेत.

पॉलिसीचा कालावधी हा पॉलिसीच्या समर्पणाची तारीख आणि पॉलिसी सुरु झाल्याची तारीख यातील फरक आहे., म्हणजे

पॉलिसीचा कालावधी = पॉलिसी समर्पित करण्याची तारीख - (वजा) पॉलिसी सुरु झाल्याची तारीख

उदाहरणार्थ, पॉलिसीच्या समर्पणाची तारीख जर 14 फेब्रुवारी 2011 असेल आणि पॉलिसी सुरु होण्याची तारीख 7 जानेवारी 2001 असेल तर पॉलिसीचा कालावधी दहा वर्षे होईल (दहा वर्षे, एक महिना आणि सात दिवस).

पॉलिसीधारकाने केवळ पाच वर्षांचे हप्ते भरले असतील, पण समर्पणाचा घटक पाच वर्षांचा नाही तर दहा वर्षांचा पकडावा लागेल.

कायद्यानुसार विमा कंपन्याना माहितीपुस्तिकेत किंवा पॉलिसीच्या कागदपत्रात, किमान खात्रीशीर समर्पण मूल्य नमूद करणे बंधनकारक आहे, ज्याचे वर्णन भरलेल्या हप्त्यांची टक्केवारी असे केले जाऊ शकते. मात्र, विमा कंपन्यांकडून प्रत्यक्षात दिले जाणारे समर्पण मूल्य खात्रीशीर समर्पण मूल्यापेक्षा जास्त असते.

झ)2 पुनरुज्जीवन

घटनेचा अभ्यास

श्री कुमार यांनी नितीश शर्माला विमा पॉलिसी रद्द न करण्याचा सल्ला दिला. त्यासाठी दोन कारणे आहेत. त्यातील सर्वात महत्वाचे कारण आहे जोखीमेचे संरक्षण रद्द होते, त्यामुळे कुठल्याही विपरित परिस्थितीचा नितीशवर सहज परिणाम होईल. त्याचप्रमाणे, नितीशने वय वाढल्यानंतर नवी विमा पॉलिसी खरेदी केली तर त्याला अधिक हप्ता द्यावा लागेल.

श्री कुमार यांनी नितीश शर्माला सांगितले की तो जर काही कारणाने हप्ते भरु शकला नाही आणि पॉलिसी रद्द झाली, तरी विमा कंपनी पॉलिसीधारकाला त्याच किंवा सुधारित अटींवर ठराविक कालावधीत पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याचा पर्याय देते.

पॉलिसी रद्द झाली तर त्याचा विमाकर्त्याला फायदा होत नाही आणि विमाधारकालाही फायदा होत नाही. विमाधारक जोखीमेसाठीचे पूर्ण रकमेचे विमा संरक्षण गमावतो आणि दावा निर्माण झाल्यास संभाव्य विपरित घटनांचा धोका संभावतो. विमाकर्त्याचेही नुकसान होते. समान हप्ते हे मृत्यूचे दावे वगळता, पॉलिसी पूर्ण कालावधीसाठी चालेल ह्या गृहितकावर आधारित असतात. पॉलिसी तयार करण्यासाठी सुरुवातीला उचलेला खर्च अधिक असतो आणि पॉलिसी कायम राहीली तरच विमाकर्त्याचा खर्च भरुन निघतो. सर्वसामान्यपणे ज्यांची तब्येत खराब असते असे लोक त्यांची पॉलिसी कायम ठेवतात, तर इतर ज्यांची तब्येत चांगली आहे ते कदाचित त्यांची पॉलिसी रद्द किंवा समर्पित करतात. त्यामुळे विपरित निवड होण्याची शक्यता असते. याचा अर्थ असा की विम्याची रक्कम निश्चित करतांना विमाकर्त्याने गृहित धरली होती त्यापेक्षा जबाबदारी अधिक असू शकते.

पॉलिसी रद्द झाल्यामुळे दोन्ही पक्षांवर विपरित परिणाम होतो, त्यामुळे विमा कंपन्या, रद्द झालेल्या पॉलिसी पुन्हा पूर्णपणे लागू होऊ देतात. या प्रक्रियेला 'पुनरुज्जीवन' असे म्हणतात. विमा कंपन्या पॉलिसीधारकाला रद्द झालेली पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याचा पर्याय देतात. विविध विमाकर्त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी वेगवेगळ्या योजना असतात; त्या सर्व पॉलिसीधारकांना रद्द झालेली पॉलिसी सोप्या अटींवर पुनरुज्जीवित करायला मदत व्हावी यासाठी असतात, ज्यामध्ये टप्प्या टप्प्याने पुनरुज्जीवन आणि कर्ज-मिश्रित-पुनरुज्जीवन इ. चाही समावेश असतो.

पॉलिसी पुनरुज्जीवित करण्यासाठी, खालील गोष्टी सर्वसामान्यपणे आवश्यक असतात:



काही विमाकर्ते एखादी पॉलिसी पाच वर्षांपेक्षा अधिक काळ रद्द राहिली असल्यास ती पुनरुज्जीवित करण्याची परवानगी देत नाहीत. विमा रक्कम किती आहे आणि पॉलिसी रद्द होऊन किती कालावधी झाला आहे यानुसार चांगल्या तब्येतीच्या दाखल्याची आवश्यकता बदलते.

झ)3 नुतनीकरण

नुतनीकरण म्हणजे काय हे आपण विभाग छ)7 मध्ये थोडक्यात पाहिले. पॉलिसी परिपक्व होण्याच्या वेळी विमा कंपनी पॉलिसीधारकांना पॉलिसीचे **नुतनीकरण** करण्यासाठी एक सूचना देऊन आमंत्रित करते.

नुतनीकरणाची सूचना देतांना, विमा कंपनी पॉलिसीधारकामुळे गटाला काय जोखीम निर्माण होईल हे नव्याने पाहील. त्यानुसार, कंपनी वेगळ्या अटींवर किंवा अधिक हप्ता घेऊन नुतनीकरणाचा प्रस्ताव देऊ शकते. पॉलिसी पहिल्यांदा घेतली तेव्हापासून काही महत्वाचे तथ्य बदलले असल्यास ते सांगण्याची आठवणही विमा कंपनी पॉलिसीधारकाला करुन देईल. पॉलिसीधारकाने पॉलिसीचे नुतनीकरण करण्यासाठी काय करावे लागेल हे त्या सूचनेमध्ये पुढे समजावून सांगितले जाईल.

त्यानंतर हा प्रस्ताव स्वीकारायचा किंवा नाकारायचा हे पॉलिसीधारकावर अवलंबून असेल. त्यांनी जर प्रस्ताव स्वीकारला, तर ते सूचनांचे पालन करतील आणि नवी पॉलिसी सुरु होईल. त्यांनी प्रस्ताव नाकारला तर संरक्षण समाप्त होईल.

झ)4 नामनिर्देशन आणि बेचन पत्र

घटनेचा अभ्यास

नितीश शर्मा त्याच्या विमा पॉलिसीची वैशिष्ट्ये आणि फायदे तपासत होता आणि त्यात त्याला काही शब्द आढळले जे त्याला समजले नाहीत. त्याने श्री कुमार यांच्याशी संपर्क केला आणि मदत मागितली.

त्याने विचारले की श्री कुमार यांनी प्रस्ताव फॉर्म भरतांना नामनिर्देशनावर का जोर दिला आहे. नितीशने 'बेचन पत्र म्हणजे काय आणि ते कसे दिले जाते हे देखील विचारले?'

झ)4(क) नामनिर्देशन

नामनिर्देशनामध्ये विमाधारक व्यक्ती त्याचा मृत्यू झाल्यास विमा कंपनी ज्यांना विम्याची रक्कम देईल त्या व्यक्तीचे(व्यक्तींचे) नाव प्रस्तावित करतो. विमाधारक व्यक्ती एक किंवा एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित करु शकते. विम्याची रक्कम वैधपणे दिली जाणे आणि त्यावर ज्यांचा अधिकार आहे त्यांच्यावतीने विश्वस्त म्हणून पैसा सांभाळणे, हा नामनिर्देशित व्यक्तीचा अधिकार असतो. पॉलिसी विकत घेतांना किंवा नंतरही नामनिर्देशन केले जाऊ शकते. ज्या व्यक्तीने दुसऱ्याच्या आयुष्यावर पॉलिसी घेतली असेल ती व्यक्ती नामनिर्देशन देऊ शकत नाही. विमा कायदा 1938 च्या 39 व्या कलमा अंतर्गत, ज्या विमाधारकाने स्वतःच्या आयुष्यावर पॉलिसी काढली आहे तो त्याचा मृत्यू झाल्यास मिळणारी पॉलिसीची रक्कम ज्यांना दिली जाईल अशी दुसरी व्यक्ती किंवा व्यक्तिंना नामनिर्देशित करु शकतो.

जाणून घ्या

जेव्हा बेचन पत्र दिले जाते (झ4क विभाग पहा) तेव्हा नामनिर्देशन वैध राहत नाही. मात्र याला एक अपवाद आहे तो म्हणजे, विमा पॉलिसीवर कर्ज मंजूर करण्यात आले असते तेव्हा त्याचा मोबदला म्हणून विमा कंपनीच्याच नावे बेचन पत्र दिले जाते तेव्हा. या प्रकरणात नामनिर्देशन कायम राहते.

नामनिर्देशनाची महत्वाची वैशिष्ट्ये

पॉलिसीमध्ये आणखी एक पृष्ठांकन करुन नामनिर्देशन बदलले जाऊ शकते. जर जागा कमी असेल तर, नामनिर्देशन कोऱ्या कागदावर करुन नंतर पॉलिसीच्या कागदपत्रांना जोडले जाऊ शकते, ज्यावर कागद जिथे पॉलिसीला जोडण्यात आला आहे त्या कोपऱ्यामध्ये विमाधारकाची स्वाक्षरी असेल. ज्याच्या आयुष्याचा विमा काढण्यात आला आहे तो पॉलिसीच्या कालावधीत नामनिर्देशनात बदल किंवा ते रद्द करणे असे काहीही करु शकतो.

जेव्हा संयुक्त जीवन पॉलिसी असेल तेव्हा, नामनिर्देशनाची कदाचित गरज नाही कारण एका विमाधारक व्यक्तीचा मृत्यू झाल्यास रक्कम जीवित विमाधारकाला दिली जाईल. तरीही, दोन्ही विमाधारक व्यक्ती संयुक्तपणे एका व्यक्तीचे नामनिर्देशन करु शकतात, ज्याला त्या दोघांचा एकाचवेळी मृत्यू झाल्यास विम्याची रक्कम मिळेल.

नामनिर्देशनामुळे केवळ विमाधारक व्यक्तीचा मृत्यू झाला तरच नामनिर्देशित व्यक्तीला पॉलिसीची रक्कम मिळण्याचा अधिकार आहे. नामनिर्देशित व्यक्तीचा संपूर्ण दाव्यावर (किंवा त्याच्या काही भागावर) कुठलाही अधिकार नाही.

नामनिर्देशित व्यक्ती अल्पवयीन असेल, तर पॉलिसीधारकाला एक व्यक्ती नियुक्त करावी लागेल. नियुक्त व्यक्तीने तसे नियुक्त म्हणून काम करण्यास परवानगी असल्याचे दाखवण्यासाठी पॉलिसीच्या कागदपत्रावर सही करणे आवश्यक आहे. जेव्हा नामनिर्देशित व्यक्ती सज्ञान होते तेव्हा नियुक्त व्यक्तीचा दर्जा समाप्त होतो. विमाधारक नियुक्त व्यक्ती कधीही बदलू शकतो. जर कोणीही नियुक्त करण्यात आले नसेल व नामनिर्देशित व्यक्ती अल्पवयीन असेल तर विमाधारक व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, दाव्याची रक्कम विमाधारकाच्या कायदेशीर वारसाला दिली जाते.

जेव्हा एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले जाते तेव्हा मृत्यूच्या दाव्याची रक्कम त्यांना संयुक्तपणे किंवा जीवित व्यक्ती अथवा व्यक्तींना दिली जाते. प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला विशिष्ट वाटा दिला जाऊ शकत नाही. नामनिर्देशन क्रमवारीनेही केले जाऊ शकते जसे: 'रश्मी गुप्ता हिला देय, ती नसल्यास पल्लव गुप्ता याला, तो नसल्यास माधव गुप्ता याला'.

पॉलिसी सुरु झाल्यानंतर केलेले नामनिर्देशन लागू होण्यासाठी ते विमाकर्त्याला कळवणे आवश्यक आहे.

नामनिर्देशित व्यक्ती विमाधारकाच्या मृत्यूनंतर मात्र मृत्यूच्या दाव्याची रक्कम दिली जाण्यापूर्वी मरण पावली, तर विमा रक्कम विमाधारक व्यक्तीच्या संपत्तीचा एक भाग होईल आणि त्याच्या कायदेशीर वारसांना दिली जाईल.

उदाहरण

विशाल मेहता हे ज्येष्ठ मनुष्यबळ कार्यकारी अधिकारी आहेत. वयाच्या 28 व्या वर्षी त्यांनी ऐंडोमेंट पॉलिसी विकत घेतली होती. त्यांनी त्यांच्या दोन वर्षांच्या मुलाला मोहितला पॉलिसीमध्ये नामनिर्देशित केले होते. नमूद करण्यात आलेल्या नियुक्त व्यक्तीचे तपशील देण्यात आले नव्हते, आणि विशाल यांनी एजंटला आश्वासन दिले होते की ते नियुक्त व्यक्तीची स्वाक्षरी नंतर घेतील. वयाच्या 35 व्या वर्षी, विशाल यांचा कार अपघातात मृत्यू झाला. जे मृत्यूपत्र सादर करण्यात आले, त्यामध्ये विशाल यांनी त्यांच्या वडिलांना कायदेशीर वारस म्हणून नियुक्त केले होते.

विशाल यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी स्वाभाविकपणे मुलाची पालक आहे. मोहितची स्वाभाविक पालक असल्याने ती पॉलिसीच्या रकमेवर दावा करु शकते का?

याचे उत्तर आहे नाही. अल्पवयीन व्यक्तींच्या स्वाभाविक किंवा नियुक्त पालकांचा पॉलिसीच्या पैशावर अधिकार नसतो. विशाल यांनी जर पत्नीला नियुक्त केले असते, तरच तिला पॉलिसीची रक्कम मिळू शकली असती, कारण मोहित हा नामनिर्देशित असला तरी अल्पवयीन आहे.

या प्रकरणी, पॉलिसीची रक्कम विशालच्या वडिलांना दिली जाईल, जे मृत्यूपत्रात नमूद केल्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

झ)4(ख)

बेचन पत्राचा संदर्भ, विमा पॉलिसीमधील नाव, अधिकार आणि हक्क दुसऱ्याला हस्तांतरित करण्याशी आहे.

बेचन पत्र देणारा	**मुखत्यार**
• जी व्यक्ती विमा पॉलिसीमधील त्याचा हक्क हस्तांतरित करते त्याला **बेचन पत्र देणारा** असे म्हणले जाते. • बेचन पत्र देणारी	• व्यक्ती किंवा संस्था ज्याच्या नावावर पॉलिसी हस्तांतरित करण्यात आली आहे त्याला **मुखत्यार** म्हणतात.

व्यक्ती सज्ञान हवी आणि तिचा पॉलिसीवर पूर्णपणे हक्क हवा	

एकदा पॉलिसीचे बेचनपत्र दिल्यावर, मुखत्याराकडे त्या पॉलिसीचा मालकी हक्क येतो आणि त्यानंतर पॉलिसीशी संबंधित कुठल्याही बाबीसंदर्भात त्याला बेचन पत्र देणाऱ्याची परवानगी घ्यावी लागत नाही. बेचन पत्र देणारा एकदा बेचन पत्र दिल्यानंतर ते रद्द करु शकत नाही किंवा त्यामध्ये बदल करु शकत नाही. मात्र मुखत्यार पुन्हा बेचनपत्र देणाऱ्याच्या नावे त्या पॉलिसीचे बेचन पत्र देऊ शकतो.

जाणून घ्या

पॉलिसीचे बेचनपत्र दिल्यानंतर मुखत्याराला तिचा मालकी हक्क मिळतो, मात्र पॉलिसीच्या नामनिर्देशनात तो बदल करु शकत नाही कारण मुखत्यार हा विमाधारक नसतो.

विमा कायद्याच्या 38 व्या कलमामध्ये विमा पॉलिसीचे बेचन पत्र देण्यासंदर्भातील कायदेशीर तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्यात नमूद करण्यात आले आहे की:-

- बेचन पत्र पॉलिसीवरच पृष्ठांकन देऊन केले जाऊ शकते किंवा वेगळेही बनवले जाऊ शकते. जेव्हा पॉलिसीवरच पृष्ठांकन देऊन बेचन पत्र दिले जाते, तेव्हा मुद्रांक शुल्काची गरज नसते. मात्र वेगळे बेचन पत्र बनवल्यास मुद्रांकनाची गरज असते;
- त्यावर बेचन पत्र देणाऱ्याची किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी हवी;
- ही स्वाक्षरी एका साक्षीदाराने साक्ष्यांकित करणे आवश्यक आहे;
- बेचन पत्र केल्यानंतर ते लागू होते;
- एका सूचनेद्वारे विमा कंपनीला बेचन पत्राविषयी कळवणे आवश्यक असते;

- बेचन पत्राची सूचना मिळाल्यानंतरच विमा कंपनी बेचनपत्र लागू झाल्याचे मानते;
- जेव्हा एकापेक्षा अधिक बेचनपत्र असतात, तेव्हा दाव्याच्या संदर्भात प्राधान्य ठरवतांना विमाकर्त्याला कुठल्या क्रमाने सूचना मिळाल्या हे विचारात घेतले जाईल.

बेचनपत्राचे प्रकार

बेचनपत्राचे दोन प्रकार असतातः

सशर्त बेचनपत्र	संपूर्ण बेचनपत्र
• विशिष्ट परिस्थिती निर्माण झाल्यास पॉलिसीचा हक्क आपोआप बेचन पत्र देणाऱ्याकडे येतो.	• पॉलिसीचा मालकी हक्क मुखत्याराकडे येतो आणि पॉलिसीचे त्याला जे हवे ते तो करु शकतो.

उदाहरण

सशर्त बेचन पत्र खालील परिस्थितीमध्ये परत केले जाऊ शकते जेव्हा:

- मुखत्याराचा बेचन पत्र देणाऱ्याच्या आधी मृत्यू होतो; किंवा
- बेचन पत्र देणारा परिपक्वतेच्या तारखेपर्यंत जगतो.

झ)5 कर्जे आणि परिसमापन

घटनेचा अभ्यास

श्री कुमार आणि नितीश शर्मा यांच्या संभाषणात नितीशने श्री कुमार यांना विचारले की जीवन विमा पॉलिसीवर कर्ज घेणे शक्य आहे असे त्याने ऐकले आहे. हे खरे आहे का**?**

श्री कुमार अशा प्रश्नाचे काय उत्तर देतील हे पाहू.

झ)5(क) पॉलिसीवर कर्ज

पॉलिसीच्या नियम आणि अटींमध्ये सुविधा असल्यास, पॉलिसीधारकाला पॉलिसीवर कर्ज काढण्याचा पर्याय असतो. सर्व पॉलिसींवर कर्ज दिले जात नाही.

विमा पॉलिसीवर काढण्यात येणाऱ्या कर्जाची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

• कर्जाची रक्कम: विमा पॉलिसीवर काढलेल्या कर्जामध्ये, कर्जाची रक्कम पॉलिसीच्या समर्पण मूल्याची ठराविक टक्केवारी असते.
• विमाकर्त्याच्या परवानगीनुसार विमाधारक एंडोमेंट पॉलिसीवर, संपूर्ण जीवन पॉलिसीवर आणि इतर पॉलिसींवर कर्ज काढू शकतो. अशा प्रकारच्या पॉलिसींमध्ये बचतीचा घटक असतो. मनी बॅक किंवा पैसे परत पॉलिसी ज्यामध्ये पॉलिसीच्या कालावधीत विमा रकमेचा काही भाग परत केला जाणे आवश्यक असते त्यावर कर्ज काढले जाऊ शकत नाही. विशिष्ट मुदतीच्या विमा पॉलिसीचे काहीही समर्पण मूल्य मिळत नाही आणि म्हणून ती कर्ज काढण्यासाठी वापरली जाऊ शकत नाही.
• कर्ज काढताना विमा कंपनीच्या नावे विमा पॉलिसीचे संपूर्ण बेचन पत्र देणे आवश्यक आहे. पॉलिसीच्या अंतर्गत कर्ज मिळवण्यासाठी विमाकर्त्याच्या नावे बेचन पत्र दिले तरी त्यामुळे सध्याचे नामनिर्देशन अवैध ठरत नाही.
• कर्जदार पॉलिसीच्या कालावधीत संपूर्ण किंवा काही प्रमाणात कर्जफेड करु शकतो. कर्जदाराला दावा निर्माण होईपर्यंत परतफेड पुढे

ढकलण्याचा पर्याय आहे.
• पॉलिसीधारक नियमितपणे हप्ते भरत राहीला, तर समर्पण मूल्य वाढत जाते आणि ते कुठल्याही वेळी थकित कर्ज आणि व्याजापेक्षा अधिक असेल.

जाणून घ्या

बँकासुद्धा पॉलिसीच्या समर्पण मूल्याच्या 75% ते 90% पर्यंत कर्ज देतात.

झ)5(ख) परिसमापन

विमा पॉलिसी समर्पित करण्याचे दोन मार्ग आहेत:

- पॉलिसीधारकाने समर्पित करणे; आणि
- विमाकर्त्याने समर्पित करणे (परिसमापन करणे)

जर कर्जदार व्याज देत नसेल किंवा व्याज आणि मुद्दल देत नसेल तर थकित कर्ज आणि व्याज, दाव्याच्या देय रकमेतून (परिपक्वतेनंतर किंवा मृत्यूनंतर) वसूल (वजा) केले जाते.

जेव्हा एखादी पॉलिसी विमाकर्त्याकडून समर्पित (रद्द) केली जाते, तेव्हा त्याला परिसमापन किंवा हक्क नष्ट करणे म्हणतात.

विमाकर्ता केवळ रद्द झालेल्या पॉलिसींचाच हक्क नष्ट करेल. जेव्हा कर्ज मंजूर झाले तेव्हा पॉलिसी कार्यरत होती, मात्र त्यानंतर पॉलिसी रद्द झाली आणि पॉलिसीधारक हप्तेही भरत नाही किंवा कर्जाचे व्याज अथवा मुद्दलही भरत नाही.

परिसमापन करण्याची किंवा हक्क नष्ट करण्याची दोन महत्वाची कारणे असू शकतातः

* कर्जदाराने पॉलिसीच्या कालावधीत कर्ज फेडण्याची निवड केली आहे आणि तो तसे करु शकत नाही; किंवा

* पॉलिसीच्या कालावधीत दावा निर्माण होईपर्यंत कर्ज थकले आणि थकित कर्ज पॉलिसीच्या समर्पण मूल्यापेक्षा जास्त झाले.

पेड अप पॉलिसी किंवा प्रदत्त पॉलिसीच्या संदर्भात, समर्पित मूल्य हे एकत्रित व्याजाएवढ्या वेगाने वाढणार नाही. काही वेळेस मुद्दल आणि व्याज समर्पण मूल्यापेक्षा अधिक होऊ शकतात. अशा परिस्थितीत हक्क नष्ट करणे आवश्यक होते.

कर्जदाराला हक्क नष्ट करण्याची सूचना दिली जाते, आणि कर्जाचे बाकी असलेले व्याज देण्याची विनंती केली जाते. जर कर्जदार व्याज भरु शकला नाही, तर पॉलिसीचा हक्क नष्ट केला जातो म्हणजे ती कर्जासाठी समर्पित केली जाते. कर्जफेड आणि बाकी व्याज काढल्यानंतर समर्पण मूल्यातील बाकी रक्कम (जर असेल तर) पॉलिसीधारकाला दिली जाते. पॉलिसीधारकाला या रकमेसाठी (डिसचार्ज व्हाउचर) पावती सादर करावी लागेल.

परिसमापन/हक्क नष्ट करण्यात आलेली पॉलिसी पुन्हा बहाल केली जाऊ शकते का?

पॉलिसीधारकाने बाकी समर्पण मूल्य घेण्यासाठी पैसे मिळाल्याची पावती सादर करण्यापूर्वी हक्क नष्ट करण्यात आलेली पॉलिसी पुन्हा बहाल केली जाऊ शकते. पॉलिसी पुन्हा बहाल करण्यासाठी, पॉलिसीधारकाला बाकी व्याज आणि 'चांगल्या तब्येतीची घोषणा' सादर करावी लागेल.

परिसमापन करण्यात आल्यास नामनिर्देशनाचे काय होते?

परिसमापन/हक्क नष्ट करण्यात आल्यास, नामनिर्देशन सक्रिय रहात नाही. समर्पित मूल्य दिले जाण्याआधी मृत्यूचा दावा आल्यास मृत विमाधारकाच्या कायदेशीर वारसांना पैसे दिले जातात.

विम्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या महत्वाच्या शब्दांचा विचार इथे पूर्ण झाला आहे. मात्र, हे प्रकरण संपवण्याआधी, आपण पुन्हा एकदा हप्ता हा विषय पाहू. विम्याचे संरक्षण कायम रहावे यासाठी हप्ते भरणे किती महत्वाचे आहे हे या प्रकरणाच्या अभ्यासातून तुम्हाला समजले असेल. हे इतके महत्वाचे असल्यामुळे याबाबत अधिक तपशीलाने पाहणे संयुक्तिक ठरेल.

ट) हप्ते भरणे आणि वैध संरक्षणाचे महत्व

जेव्हा विमा पॉलिसी खरेदी केली जाते, तेव्हा जोखीम विमाधारकाकडून विमा कंपनीकडे हस्तांतरित केली जाते. जोखीम हस्तांतरणाचा मोबदला म्हणून पॉलिसीधारकाला विमा कंपनीला हप्ता द्यावा लागतो. जर प्रस्तावकर्त्याने कधीच हप्ता भरला नाही, तर पॉलिसी कधीच सक्रिय होणार नाही. कारण, आपण 3ऱ्या प्रकरणाच्या पहिल्या भागात पाहिले की करार वैध होण्यासाठी मोबदला आवश्यक आहे. प्रस्तावकर्त्याने हप्ता भरला नाही तर कुठलाही मोबदला आणि करार नसेल. म्हणूनच, आपण विभाग ज)3(क) मध्ये पाहिल्याप्रमाणे, पहिल्या हप्त्याची पावती ही विमा करार सुरु झाल्याचा पुरावा आहे.

प्रस्ताव स्वीकारण्यात आला आणि पहिला हप्ता भरल्यानंतर लगेच विमा कंपनी मृत्यूचा दावा देण्यास बांधील होते, याला पॉलिसीच्या अटी आणि नियम लागू होतात. मात्र, पॉलिसीधारकाने पुढील हप्ते भरले नाहीत तर पॉलिसी रद्द होईल आणि काही वाईट घडल्यास, त्यांचा अधिकार असलेले फायदे त्यांना मिळणार नाहीत. त्यांचे काही हप्ते परत मिळावेत एवढीच जास्तीत जास्त आशा ते करु शकतात. आपण या परिस्थितीविषयी विभाग झ)1(क) मध्ये पाहिले.

वैध विमा करार अस्तित्वात असावा आणि प्रस्तावकर्त्याने ज्यासाठी विमा घेतला ते संरक्षण कायम रहावे यासाठी हप्ता भरणे किती महत्वाचे आहे हे आपण याद्वारे पाहू शकता.

घटनेचा अभ्यास

नितीश शर्माला त्याच्या पॉलिसीविषयी काही चिंता होती आणि आणखी काही प्रश्नांसाठी श्री कुमार यांच्याशी एकदा शेवटचा संपर्क केला. त्याने विचारले की आजारपणामुळे हप्ता भरण्यास उशीर झाला आणि तो भरण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला तर काय होईल? हप्त्याचे धनादेश पोस्टाने पाठवून, पोस्टाच्या कार्यालयातून परतत असतांना त्याचा मृत्यू झाला तर काय होईल? त्याला तरीही संरक्षण दिले जाईल का किंवा त्याचा मृत्यू झाल्यास सुमेधाला संरक्षण मिळावे यासाठी त्याने जी मेहनत केली आहे ते संरक्षण सुमेधाला मिळणार नाही का?

श्री कुमार यांनी संयमाने पुन्हा नितीशच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

विमाधारकाचा मृत्यू झाला आणि हप्ता भरण्यात आला नसेल तर काय होईल?

हप्ता भरण्यास झालेला उशीर विमा कंपनीने वाढवून दिलेल्या कालावधीच्या आत असेल तर विमा कंपनी नामनिर्देशित किंवा कायदेशीर भोगवटादाराला दाव्याची पूर्ण रक्कम देण्यास बांधील आहे. विमा कंपनी न भरलेला हप्ता दाव्याच्या रकमेतून वजा करेल.

हप्ता भरल्याचे केव्हा मानले जाते?

जेव्हा विमा कंपनीला हप्ताचे पैसे मिळतात तेव्हाच तो भरल्याचे मानले जाते. पैसे धनादेश, डिमांड ड्राफ्ट किंवा मनी ऑर्डरने भरले असतील तर विमा कंपनीच्या खात्यात पैसे जमा झाल्यानंतरच पैसे भरल्याचे मानले जाईल. मात्र, व्यवहारात जेव्हा कुठल्याही स्वरुपात पैसे देण्यात आले तरी हप्ता भरल्याचे मानले जाते.

धनादेश/डिमांड ड्राप्ट/ मनी ऑर्डर वठण्याच्या प्रक्रियेत असतांना जर विमाधारकाचा मृत्यू झाला तर काय?

धनादेश/डिमांड ड्राफ्ट/ मनी ऑर्डर वठण्याच्या प्रक्रियेत असतांना जर विमाधारकाचा मृत्यू झाला म्हणजे पॉलिसीधारकाने धनादेश, डिमांड ड्राफ्ट किंवा मनी ऑर्डर आधीच पाठवली असेल मात्र विमा कंपनीला अजून ती मिळाली नसेल, तर विमा कंपनी ही 'कागदपत्रे पाठवण्यात आल्याचा पुरावा' मागते. 'डिमांड ड्राफ्ट' आणि 'मनी ऑर्डर' अशा कागदपत्रांचा पुरावा सादर केला जाऊ शकतो. पुरावा सादर केल्यानंतर विमा कंपनी हप्ता भरल्याचे मानते. मात्र, धनादेश पोस्टाद्वारे पाठवण्यात आला असेल, तर विमा कंपनीला तो पोस्टाद्वारे पाठवल्याचा पुरावा लागेल.

महत्वाचे मुद्दे
विमा पॉलिसी कशा खरेदी केल्या जातात आणि लिहील्या जातात
• विमा कंपन्या माहितीपुस्तिका आणि जाहिरातींद्वारे त्यांच्या उत्पादनांबाबत स्वारस्य निर्माण करतात.
• व्यक्तीने एखादी पॉलिसी त्याच्या गरजा किती चांगल्या पद्धतीने पूर्ण करेल याचा काळजीपूर्वक विचार करुनच पॉलिसी खरेदी केली पाहिजे.
• जीवन विमा एका आयुष्यावर किंवा संयुक्त आयुष्याच्या आधारे, तसेच

प्रस्तावकर्त्याच्या स्वतःच्या आयुष्यावर किंवा दुसऱ्याच्या आयुष्यावर लिहीला जाऊ शकतो.
महत्वाची कागदपत्रे
• प्रस्ताव फॉर्म हा माहितीचा मुख्य स्त्रोत असतो ज्याद्वारे विमा लेखक प्रस्तावाच्या जोखीमेचे मूल्यांकन करतो.
• वयाचा वैध दाखला म्हणून जी कागदपत्रे स्वीकारली जाऊ शकतात त्यापैकी काही आहेत, उच्च माध्यमिक शाळेचे गुणपत्रक, पारपत्र, जन्माचे प्रमाणपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, मतदार ओळख पत्र इ.
• विमा कंपनी प्रस्तावकर्त्याला त्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आल्याचे कळवते आणि हप्त्याची पहिली पावती (एफपीआर) देऊन हप्ता मिळाल्याचे सांगते.
• पॉलिसीधारकांकडून जेव्हा त्यानंतरचे हप्ते मिळतात तेव्हा विमा कंपनी हप्त्याच्या नुतनीकरणाच्या पावत्या (आरपीआर) देते.
• पॉलिसीचे कागदपत्र हे महत्वाचे कागदपत्र आहे. विमाधारक आणि विमाकंपनी यांच्यातील कराराचा तो पुरावा आहे.
• विमा कंपनी पृष्ठांकनाद्वारे पॉलिसीच्या मूळ कागदपत्रामध्ये

सुधारणा/बदल करायची परवानगी देते.
विम्यातील महत्वाचे शब्द
• नियोजित तारखा म्हणजे पॉलिसीधारकाने विमा कंपनीला ज्या तारखांना पॉलिसीचे हप्ते भरणे आवश्यक आहे.
• वाढीव मुदतीनंतरही हप्ता भरला नाही, तर पॉलिसी रद्द केली जाते.
• प्रदत्त मूल्य= [(भरलेल्या हप्त्यांची संख्या/देय हप्त्यांची संख्या) × विमाकृत रक्कम] + बोनस.
• एकदा पॉलिसी समर्पित केल्यानंतर विमा कंपनीद्वारे देय असलेली रक्कम म्हणजे 'समर्पण मूल्य' किंवा 'रोख मूल्य'.
• जेव्हा रद्द झालेली पॉलिसी पुन्हा बहाल केली जाते तेव्हा त्याला पॉलिसीचे नुतनीकरण म्हटले जाते.
• नामनिर्देशन म्हणजे विमाधारक व्यक्ती त्याचा मृत्यू झाल्यास विम्याची रक्कम कोणाला दिली जावी यासाठी व्यक्तीचे(व्यक्तींचे) नाव सुचवते.
• बेचन पत्र देणाऱ्याने मुखत्याराला विमा पॉलिसीचे स्वामित्व, अधिकार आणि हित हस्तांतरित करणे म्हणजे बेचन पत्र देणे.

- कर्जदाराने कर्जाची परतफेड केली नाही, तर विमा कंपनीला पॉलिसी रद्द करण्याचा पर्याय असतो. याला परिसमापन करणे किंवा हक्क नष्ट करणे असे म्हणतात.

हप्ते भरणे आणि वैध संरक्षणाचे महत्व

- हप्ते भरणे हा विमा करारासाठीचा मोबदला आहे आणि म्हणूनच तो भरला नाही तर कराराचे अस्तित्व राहणार नाही आणि संरक्षणही राहणार नाही.

प्रश्नोत्तरे

3.3 जी कागदपत्रे वयाचा वैध दाखला म्हणून स्वीकारली जाऊ शकतात त्यांचे वयाच्या दाखल्याचा मानक पुरावा कागदपत्रे आणि वयाच्या दाखल्याचा गैर-मानक पुरावा कागदपत्रे असे वर्गीकरण केले जाऊ शकते. वयाच्या दाखल्याचा मानक पुरावा म्हणून घेतली जाऊ शकतात ती आहेतः

- शाळा किंवा कॉलेजच्या नोंदींमधले प्रमाणपत्र;
- जन्म-मृत्यू नोंदणी अधिकाऱ्याकडून प्रमाणित प्रमाणपत्र किंवा जन्माच्या वेळी नगरपालिकेमध्ये केलेल्या नोंदीवरुन प्रमाणपत्र;
- पारपत्र;
- परमनंट अकाउंट नंबर (पॅन) कार्ड;
- मालकाचे सेवा नोंदणीपुस्तक;

- बाप्तिस्म्याचे प्रमाणपत्र;
- कुटुंबाच्या बायबलच्या प्रतिवर जन्मतारीख असेल तर तिचा प्रमाणित भाग;
- सैन्यदलातील कर्मचाऱ्यांचे संरक्षण विभागाने दिलेले ओळखपत्र;
- रोमन कॅथलिक चर्चचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

वर उल्लेख केलेल्या मानक कागदपत्रांशिवाय वयाच्या दाखल्याची काही गैर-मानक कागदपत्रे जी वयाचा वैध दाखला म्हणून स्वीकारली जाऊ शकतात ती आहेत:

- स्वयंघोषणेच्या पद्धतीने प्रतिज्ञापत्र, वयाने मोठ्या व्यक्तीने घोषित करणे
- ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र
- जन्माच्या वेळी बनविण्यात आलेली जन्मपत्रिका; आणि
- शिधावाटप पत्रिका.

3.4

एफपीआरमध्ये खालील माहिती असते:

- विमाधारकाचे नाव आणि पत्ता;
- पॉलिसी क्रमांक;
- भरलेल्या हप्त्याची रक्कम;
- हप्ता भरण्याची पद्धत आणि कालावधी;
- हप्ता भरण्याची पुढची तारीख;
- जोखीम लागू झाल्याची तारीख (जेव्हापासून संरक्षण लागू होते);
- पॉलिसी परिपक्व होण्याची तारीख;

• शेवटचा हप्ता भरण्याची तारीख; आणि • विमा रक्कम.

स्वयं-चाचणी प्रश्न
3. नामनिर्देशित जर अल्पवयीन असेल आणि कुणालाही नियुक्त करण्यात आले नसेल तर काय होईल?
4. निवांतपणे विचार करण्याचा कालावधी म्हणजे काय?
5. पॉलिसी रद्द झाल्यास काय होते?

तुम्हाला पुढच्या पानावर उत्तरे मिळतील

स्वयं-चाचणी प्रश्न
3. नामनिर्देशित जर अल्पवयीन असेल, तर विमाधारकाने एखादी व्यक्ती नियुक्त करण्याची आवश्यकता असते. जर कुणालाही नियुक्त करण्यात आले नसेल आणि विमाधारकाचा मृत्यू झाल्यास मृत्यूच्या दाव्याची रक्कम कायदेशीर वारसाला दिली जाईल आणि अल्पवयीन व्यक्तीच्या स्वाभाविक किंवा नियुक्त पालकाला दिली जाणार नाही.
4. एफपीआर देऊन विमा करार सुरु केला जातो. मात्र आयआरडीए

नियमांनुसार पॉलिसी दिल्यानंतर प्रस्तावकर्त्याला करारातून 15 दिवसांच्या आत पॉलिसीतून माघार घेण्याचा पर्याय आहे. या कालावधीला ‘विचार करण्यासाठीचा कालावधी’ म्हणतात. प्रस्तावकर्त्याने करारातून माघार घेतली, तर विमा कंपनीला भरण्यात आलेले हप्ते, थोड्या कालावधीच्या जोखीमेचा खर्च, वैद्यकीय तपासणीचा खर्च आणि मुद्रांक शुल्क वगळून, परत द्यावे लागतील.
5. पॉलिसी ‘रद्द’ झाल्यानंतर, पॉलिसीधारक सर्व हप्ते गमावतो आणि त्या पॉलिसीवर कोणताही दावा केला जात नाही. मात्र, विमाकर्ता करार रद्द करत नाहीत. ते पॉलिसीधारकाला विविध सोपे पर्याय, जसे थकित हप्ते भरणे, चांगली तब्येत कायम असल्याची स्वाक्षरी केलेली घोषणा देणे वगैरे देऊन पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याची परवानगी देतात.